**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 09 वाजून 20 मिनिटं**

**दिनांकः 10.10.2023** **वारः मंगळवार**

---

**ठळक बातम्या**

- अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, ब्रिटन आणि इटलीचा इस्त्राईलला पाठिंबा. इस्त्राईलकडून गाझापट्टीत हवाई हल्ले सुरूच. संघर्षात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या सोळाशेपेक्षा जास्त.
- आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी खेळाडूंशी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत संवाद साधणार.
- केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आजपासून मोरोक्कोच्या दौऱ्यावर
- जम्मू-काश्मीरमधील शोपियां भागात लष्करी चकमकीत दोन दहशतवादी ठार

आणि

- विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत न्यूझीलंडकडून नेदरलँड्सचा 99 धावांनी पराभव.

**अमेरिका इस्त्राईल पाठिंबा**

अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, ब्रिटन आणि इटलीनं काल संयुक्त निवेदन प्रसिद्ध करून इस्त्राईलला पाठिंबा दिला आहे. हमास या दहशतवादी संघटनेनं इस्त्राईलवर केलेल्या हल्ल्याचा या देशांनी तीव्र निषेध केला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन, फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन, जर्मनीचे चॅन्सेलर ओलाफ शोल्झ, इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी आणि ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांनी म्हटलं आहे, की हमासनं केलेल्या दहशतवादी कारवायांचं कोणत्याही प्रकारे समर्थन केलं जाऊ शकत नाही. हमासच्या अतिरेक्यांनी अनेक कुटुंबांची त्यांच्या घरात हत्या केली, दोनशे तरुणांची संगीत महोत्सवात हत्या केली आणि ज्येष्ठ महिला आणि मुलांसह अनेकांचं अपहरण करून त्यांना ओलीस ठेवलं आहे.इस्त्राईल स्वतःच्या संरक्षणासाठी आणि आपल्या नागरिकांना वाचवण्यासाठी करत असलेल्या सगळ्या प्रयत्नांना आम्ही साथ देऊ असं या देशांनी म्हटलं आहे. पॅलेस्टाईनच्या कायदेशीर मागण्यांची जाणीव असल्याचं या देशांनी नमूद केलं आहे, मात्र हमास या मागण्यांचं प्रतिनिधीत्व करत नाही आणि पॅलेस्टिनी नागरिकांना हिंसाचार आणि रक्तपात यांच्याशिवाय दुसरं काही देत नाही, असंही स्पष्टपणे म्हटलं आहे.

दरम्यान, इस्त्राईलकडून गाझापट्टीत हवाई हल्ले सुरूच आहेत. इस्त्राईलचे संरक्षणमंत्री योआव्ह गॅलंट यांनी गाझाला वेढा घालण्याचे आदेश दिले आहेत. त्या भागातला वीज आणि इंधन पुरवठ्यावर बंदी घालण्यात आली आहे. या संघर्षात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या सोळाशेपेक्षा जास्त झाली असून, गाझा पट्टीतून सुमारे सव्वा लाख लोकांनी घर सोडलं आहे. इस्त्राईलमध्ये 900 जणांचा मृत्यू झाला आहे, तर 26 शे हून अधिक जण जखमी झाले आहेत. गाझा पट्टीत इस्त्राईलच्या हवाई हल्ल्यात सहाशेपेक्षा जास्त जणांचा मृत्यू

झाला आहे आणि 2700 नागरिक जखमी झाल्याचं गाझाच्या आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे. इस्राईलमध्ये आपल्या नऊ नागरिकांचा मृत्यू झाल्याचं अमेरिकेनं म्हटलं आहे. ब्रिटनचे दहा आणि नेपाळचेही दहा नागरिक इस्राईलमध्ये मारले गेले आहेत. ऑस्ट्रिया आणि जर्मनीनं पॅलेस्टाईनला मदत स्थगित केल्याचं जाहीर केलं आहे.

**पंतप्रधान खेळाडू संवाद**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी खेळाडूंची भेट घेणार आहेत आणि त्यांच्याशी संवाद साधणार आहेत. आशियाई क्रीडा स्पर्धेत या खेळाडूंनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीबद्दल पंतप्रधानांनी या खेळाडूंना आमंत्रित केलं आहे. खेळाडू, प्रशिक्षक आणि भारतीय ऑलिंपिक संघटना आणि विविध क्रीडा संघटनांचे पदाधिकारी या कार्यक्रमात उपस्थित राहणार आहेत.भारतानं या स्पर्धेत 28 सुवर्णपदकांसह 107 पदकांची कमाई केली आहे. पंतप्रधानांनी त्याबद्दल खेळाडूंचं अभिनंदन केलं आहे आणि या खेळाडूंच्या कामगिरीमुळे प्रत्येक भारतीयाचं हृदय अभिमानानं भरून गेलं आहे असं म्हटलं आहे.

**निवडणूक**

निवडणूक आयोगाने काल पाच राज्यांच्या निवडणुकांचं  वेळापत्रक जाहीर केलं. मिझोराम, छत्तीसगड, मध्य प्रदेश, राजस्थान आणि तेलंगणमध्ये 7 ते 30 नोव्हेंबर दरम्यान विविध टप्प्यात विधानसभा निवडणुका होतील.  या पाचही राज्यांची मतमोजणी 3 डिसेंबर रोजी होणार आहे. मिझोराममध्ये 7 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. छत्तीसगडमध्ये 7 आणि 17 नोव्हेंबर रोजी दोन टप्प्यात मतदान आहे. मध्य प्रदेशात 17 नोव्हेंबरला, राजस्थानमध्ये 23 नोव्हेंबरला, तर तेलंगण विधानसभेसाठी 30 नोव्हेंबरला मतदान होणार आहे.2024च्या लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी या विधानसभा निवडणुका होणार असल्यामुळे  या पाच राज्यांतील निवडणुकांना अनन्यसाधारण महत्त्व असल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी काल नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांना सांगितलं . या पाच राज्यांमध्ये विधानसभेच्या 679 जागा आहेत; या राज्यात 16 कोटी मतदार असून सुमारे 60 लाख मतदार प्रथमच मतदान करणार आहेत.

**सीतारामन मोरोक्को**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आजपासून मोरोक्कोच्या दौऱ्यावर जात आहेत. त्या जी-वीस गटाच्या बैठकांसह जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या वार्षिक बैठकांना हजर राहणार आहेत. या वार्षिक बैठकांना जगभरातील अर्थमंत्री आणि मध्यवर्ती बँकांचे प्रमुख उपस्थिती लावणार आहेत. निर्मला सीतारामन आणि रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास जी-वीसच्या अर्थमंत्री आणि मध्यवर्ती बँकांच्या गव्हर्नरांच्या बैठकीचं सहअध्यक्षपद भूषवणार आहेत.

**टांझानिया अध्यक्ष दौरा**

टांझानियाच्या अध्यक्ष समिया सुलुहू हसन यांनी काल राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. राष्ट्रपतींनी हसन यांच्यासाठी शाही भोजनही आयोजित केलं होतं. टांझानियाबरोबर भारताचे संबंध अनेक वर्षांपासून असल्याचं राष्ट्रपतींनी नमूद केलं आणि सुमारे दोनशे वर्षांपासून टांझानियामध्ये भारतीय नागरिक असणं हे टांझानियाच्या सर्वसमावेशक संस्कृतीचं आणि आदरातिथ्याचं द्योतक असल्याचं सांगितलं. विकसनशील देशांपुढे समान उद्दिष्टं आणि आव्हानं असताना भारत आणि टांझानिया एकमेकांना पाठबळ देत असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. उभय देशांमधली भागिदारी धोरणात्मक भागिदारीपर्यंत नेण्यावर उभय नेत्यांचं एकमत झालं.

**नौदल आढावा**

नौदलाच्या पूर्व विभागाचे प्रमुख व्हाईस ॲडमिरल राजेश पेंढारकर यांनी पूर्व विभागाच्या सज्जतेचा आढावा घेतला. नौदलाच्या पूर्वेकडील ताफ्यातील जहाजांच्या भूपृष्ठावरील, पाण्याखालील, हवेतील आणि वायूभेदी प्रकारच्या कार्यसिद्धतेचा त्यांनी आढावा घेतला. या विभागात नौदलाची जहाजं सर्व प्रकारे कोणत्याही संकटांना सामोरी जाण्यासाठी सज्ज असल्याबद्दल व्हाईस ॲडमिरल पेंढारकर यांनी समाधान व्यक्त केलं.

**दोन अतिरेकी ठार**

जम्मू-काश्मीरमधील शोपियां भागात लष्कराशी झालेल्या चकमकीत आज सकाळी दोन दहशतवादी मारले गेले. हे दहशतवादी लष्करे तैयबा संघटनेचे आहेत. मोरिफत मकबूल आणि अबरार असं त्यांचं नाव आहे. अबरार हा काश्मिरी पंडित संजय शर्मा यांच्या हत्येमध्ये सहभागी होता. काल रात्रीपासून या भागात चकमक सुरू होती.

**सीबीसी-एफएम रेडिओ**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाअंतर्गत सेंट्रल ब्युरो ऑफ कम्युनिकेशन अर्थात केंद्रीय संचार ब्युरोनं खाजगी एफएम रेडिओ केंद्रांवरील जाहिरात दरांमध्ये 7 वर्षांनंतर बदल करत मूळ दरामध्ये 43 टक्के वाढ केली आहे. तसंच श्रोत्यांच्या संख्येप्रमाणे प्रत्येक शहरानुसार या दरामध्ये लक्षणीय वाढ अपेक्षित आहे. त्यामुळे आता एफएमसाठी रेडिओवरील जाहिरातीचे दर हे प्रत्येक 10 सेकंदाकरता 52 ते 74 रुपयांनी वाढणार आहेत. देशात सध्या कार्यरत असलेल्या 400 हून अधिक कम्युनिटी रेडिओ केंद्रांसाठी देखील ही दरवाढ फायदेशीर ठरणार आहे. या दरवाढीमुळे श्रोता-संख्येनुसार आणि शहरानुसार; 106 खाजगी एफएम वाहिन्यांचे जाहिरात दर 100 टक्क्यांनी वाढतील, तर 81 वाहिन्यांच्या दरात 50 ते 100 टक्क्यांनी वाढ होईल. 65 वाहिन्यांच्या दरात 50 टक्क्यांपेक्षा कमी वाढ अपेक्षित आहे.

**सिक्कीम**

सिक्कीम इथल्या पुरात भारतीय लष्कराच्या 10 जवानांसह आत्तापर्यंत 36 जण मृत्युमुखी पडले असून 80 लोक अद्याप बेपत्ता आहेत. आंतर-मंत्रालयीन केंद्रीय पथक आज सिक्कीम मधील मंगन, नागा आणि चुंगथांग या पूरग्रस्त भागांना भेट देणार आहे. या पथकानं काल विविध पायाभूत सुविधांच्या नुकसानीचं मूल्यांकन केलं. मदत आणि पुनर्वसन प्रयत्नांचं मुल्यांकन करण्यासाठी माजिगाव इथल्या मदत शिबिरालाही भेट देण्यात आली. केंद्रीय पथकाने मदत केंद्रांवर योग्य स्वच्छता राखण्याची शिफारस केली आणि निर्वासितांसाठी मानसिक आरोग्य समुपदेशन सुरु करावं असंही सुचवलं.

**क्रिकेट**

विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत काल हैदराबादमध्ये झालेल्या सामन्यात न्यूझीलंडनं नेदरलँड्सचा 99 धावांनी पराभव केला. 323 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना नेदरलँड्सच्या संघाने 46 षटकं आणि 3 चेंडूंमध्ये सर्व गडी बाद 223 धावा केल्या. तत्पूर्वी, न्यूझीलंडनं प्रथम फलंदाजी करत निर्धारित 50 षटकांत 7 गडी बाद 322 धावा केल्या. आज, धर्मशाला इथं सकाळी 10.30 वाजता इंग्लंडचा सामना बांगलादेशबरोबर होईल तर दुपारी 2 वाजल्यापासून हैदराबादमध्ये पाकिस्तान आणि श्रीलंकेचा सामना खेळला जाईल. दरम्यान, उद्या अफगाणिस्तानविरुद्धच्या दुसऱ्या विश्वकरंडक सामन्यासाठी भारतीय क्रिकेट संघ दिल्लीतल्या अरुण जेटली स्टेडियमवर दाखल झाला आहे. रविवारी चेन्नई इथे भारतानं सहा गडी राखून ऑस्ट्रेलियाचा पराभव केला होता.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**